# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 06 February 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०६ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- मराठवाड्यातला दुष्काळ हा भूतकाळ करण्याचा मुख्यमंत्र्यांचा निर्धार–नदीजोड प्रकल्पाच्या कामाला लवकरच प्रारंभ करण्याची ग्वाही
- छत्रपती संभाजीनगर इथं 'घाटी रुग्णालया'च्या विकासासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्याचं अर्थ मंत्री अजित पवार यांचं आश्वासन
- औद्योगिक जमिनीसाठी बिगरशेतीची आवश्यकता नाही, तसंच, वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एक करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा राज्य सरकारचा निर्णय
- विघनवाडी ते बीड रेल्वेमार्गाची चाचणी यशस्वी–बीडवासियांची रेल्वेची इच्छा सुफळ

आणि

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राची सर्वाधिक ८२ पदकांची कमाई

****

मराठवाड्यातला दुष्काळ हा भूतकाळ करण्याचा निर्धार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. ते काल बीड जिल्ह्यात आष्टी तालुक्यात खुंटेफळ साठवण तलावाचं भूमिपूजन केल्यानंतर बोलत होते. पश्चिम वाहिनी नद्यांचं सुमारे ५३ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणणाऱ्या नदीजोड प्रकल्पाच्या कामाला लवकरच प्रारंभ होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला, ते म्हणाले…

***''महाराष्ट्रातले जे चार नदीजोड प्रकल्प आहेत, ज्या प्रकल्पांमुळे विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र हा पूर्णपणे दुष्काळमुक्त होणार आहे. या प्रकल्पाचा पाठपुरावा सुरू केला, आणि त्याचे***

***आपण सर्वेक्षणाचे टेंडरदेखील काढले. मला हा विश्वास आहे, की आता येत्या वर्षभरामध्ये हे नदीजोड प्रकल्पाचं काम आपण सुरू करू. आणि हे त्रेपन्न टी एम सी पाणी आपण गोदावरीच्या खोऱ्यामध्ये आणल्यानंतर मराठवाडा दुष्काळमुक्त होईल. आपण हा निर्धार केला, की काहीही झालं तरी मराठवाड्याच्या पुढच्या पिढीला आपण दुष्काळ पाहू द्यायचा नाही. मराठवाड्यातला दुष्काळ हा भूतकाळ करता येईल.''***

मुख्यमंत्री सौर कृषी वीज योजनेचं काम मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होईल, आणि राज्यभरातल्या सर्व शेतकऱ्यांना लागणारा १६ हजार मेगावॅट वीज पुरवठा दिवसा केला जाईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांना मोफत मिळणारी ही वीज राज्य सरकारला तीन रुपये प्रतियुनीट दराने मिळणार आहे, पुढची पाच वर्ष वीजेचे दर कमी करून, घरगुती आणि औद्योगिक वीज ग्राहकांना याचा लाभ दिला जाणार असल्याचं, त्यांनी सांगितलं,

***''मागच्या काळामध्ये दरवर्षी आपण नऊ टक्के भाववाढ केली. पण आत्ताच आमच्या विद्युत विभागाने पुढच्या पाच वर्षाचे आपले वीजेचे दर काय असतील, याची पिटीशन दाखल केली. आणि सांगताना मला आनंद होतो, पुढचे पाचही वर्ष दरवर्षी वीजेचे भाव आम्ही कमी करत जाणार आहे. घरगुती वीजेचे भाव आणि औद्योगिक वीजेचे भावदेखील.''***

संतोष देशमुख हत्या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची ग्वाही देत, जातीपातीचं राजकारण बाजूला ठेवत, बीडची वैभवशाली ओळख जगासमोर आणण्याचं आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलं.

खो- खो विश्वचषक स्पर्धेतल्या विजेत्या संघातले खेळाडू प्रतिक वाईकर, प्रियांका इंगळे, राम कश्यप, सुयश गरगटे, अश्विनी शिंदे, रेश्मा राठोड आणि प्रशिक्षक प्राची वाईकर, शिरीन गोडबोले यांचा यावेळी सत्कार झाला.

आष्टी तालुक्यात सावरगाव इथं मच्छिंद्रनाथ समाधी मंदिराचं भूमिपूजनही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अर्थात 'घाटी' च्या विकासासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात येईल, असं आश्वासन, उपमुख्यमंत्री तथा अर्थ मंत्री अजित पवार यांनी दिलं. जिल्हा वार्षिक योजनेच्या राज्यस्तरीय बैठकीत काल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या आढावा घेतनाा ते बोलत होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला जास्तीत जास्त निधी देण्याचा प्रयत्न असल्याचं सांगत, जिल्ह्याचा २०२५-२६ या वर्षाचा आराखडा हा १२०० कोटी रुपयांचा तयार करण्यात आला असून, प्राप्त निधीचा विनियोग गुणवत्तापूर्ण कामांसाठी करावा, असे निर्देश पवार यांनी दिले.

केंद्र आणि राज्य शासनाच्या अक्षय ऊर्जा निर्मितीसंदर्भात सर्व जिल्ह्यांनी सकारात्मकतेनं काम करावं आणि जिल्ह्याच्या वार्षिक आराखड्यामध्ये शाळा, कार्यालयांच्या सौर ऊर्जेसंदर्भात प्रस्तावाचा समावेश करावा, अशी सूचना पवार यांनी यावेळी सगळ्या जिल्ह्यांच्या अधिकाऱ्यांना केली.

लातूर शहरातल्या गंजगोलाई या ऐतिहासिक वैभवाच्या ठिकाणाला जोडणारे रस्ते आणि परिसराच्या सुशोभिकरणाला निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अधिकाऱ्यांनी या कामाचा सविस्तर आराखडा सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागासवर्ग कल्याण मंत्री अतुल सावे यांच्यासह जिल्हा प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी या बैठकीला दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. जिल्ह्यात येऊ घातलेली औद्योगिक गुंतवणूक पाहता येत्या पाच वर्षात शहराची लोकसंख्या वाढणार असून, त्यादृष्टीनं निर्माण करण्याच्या पायाभूत सुविधा आणि अन्य आवश्यकतांसाठी वाढीव नियोजन करण्यात आलं असल्याचं, तसंच जिल्ह्यातली ५० टक्के लोकसंख्या शहरी भागात राहत असल्याचं सांगत, पालकमंत्री शिरसाट यांनी नागरी सुविधा विकासासाठी वाढीव निधी मिळावा, अशी मागणी केली.

****

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज नांदेड दौऱ्यावर येत आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर मतदारांचे आणि लाडक्या बहिणींचे आभार मानण्यासाठी नांदेडमध्ये ते जाहीर सभा घेणार आहेत. नांदेड इथल्या श्री हुजूर साहेब सचखंड गुरुद्वाराला देखील शिंदे भेट देणार आहेत.

****

औद्योगिक जमिनीसाठी बिगरशेती – एनए ची आवश्यकता असणार नाही, तसंच, वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एक करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. याकरता महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत बदल करण्यात येणार असल्याचं, याबाबत जारी पत्रकात म्हटलं आहे. केंद्र सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाच्या व्यापार सुलभता – इज ऑफ डुईंग बिझनेस या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

****

राज्यातल्या सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये विद्यार्थी हितासाठी "कॅरी ऑन योजना" लागू करण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेऊन विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेची संधी देण्यासाठी विद्यापीठांच्या पातळीवर एकसमानता ठेवावी, अशी सूचना उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. काल मंत्रालयात यासंदर्भातल्या बैठकीत ते बोलत होते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, त्यांचं वर्ष वाया जाऊ नये, यासाठी कॅरी ऑन योजना सुरू करण्याची सूचना पाटील यांनी केली.

****

केंद्र सरकारतर्फे कालपासून देशव्यापी जलसंधारण यात्रा काढण्यात आली आहे. 'जल लाये, धनधान्य' अशी या यात्रेची मध्यवर्ती संकल्पना आहे. ही यात्रा येत्या ६० ते ९० दिवसांत २६ राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या सहा हजार ६७३ ग्रामपंचायतींना, देशभरातल्या ८०५ प्रकल्पांची माहिती देईल. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना दोन, चा भाग असलेल्या या यात्रेचा उद्देश, जलसंधारण आणि मातीच्या नापिक होण्याबद्दल जनजागृती करणं, हा आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या विघनवाडी ते बीड या रेल्वेमार्गाची जलदगती चाचणी काल झाली. अहिल्यानगर ते बीड या २६१ किलोमीटर अंतराच्या रेल्वेसेवेची बीडवासियांची गेल्या तीन दशकापासून मागणी होती, अमळनेरपर्यंतचा रेल्वेमार्ग तयार झाल्यानंतर काही काळ हे काम थांबलं होतं, मात्र आता बीड जिल्ह्याची या रेल्वे सेवेची प्रतिक्षा पूर्ण झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

महाराष्ट्र बालनाट्य स्पर्धेचे मराठवाडा विभागाचे निकाल जाहीर झाले असून, नांदेडच्या टायनी एंजल्स स्कूल या संस्थेच्या 'प्लॉट नं. शून्य', या नाटकानं पहिला क्रमांक पटकावला आहे. नांदेडच्याच शाकुंतल स्कूल फॉर एक्सलन्स या संस्थेच्या 'आभाळ' या नाटकाचा द्वितीय, परभणीच्या गोपाला फाऊंडेशन या संस्थेच्या 'झाले

मोकळे आभाळ’ या नाटकाचा तृतीय, तर मंठा इथल्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या ‘लपंडाव’ या नाटकाचा चौथा क्रमांक आला आहे. ही चारही नाटकं अंतिम फेरीसाठी पात्र ठरली आहेत.

****

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक ८२ पदकांची कमाई केली आहे. त्यात १६ सुवर्ण, ३५ रौप्य आणि ३१ कास्यपदकांचा समावेश आहे. सर्वाधिक सुवर्ण पदक जिंकून कर्नाटक पहिल्या, सेना दल दुसर्या तर महाराष्ट्र तिसर्या स्थानावर आहे.

****

पुरुष क्रिकेटमध्ये, भारत आणि इंग्लंड दरम्यान तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज नागपूर इथं खेळला जाणार आहे. दुपारी दीड वाजता सामन्याला सुरुवात होईल.

****

छत्रपती संभाजीनगर इथं दोन कोटी रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण झालेल्या चैतन्य तुपे या सात वर्षीय मुलाची पोलिसांनी काल सुटका केली. याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली आहे. मंगळवारी रात्री चैतन्य हा वडील सुनिल तुपे यांच्यासोबत खेळत असताना त्याचं अपहरण झालं होतं.

****

परभणी जिल्ह्यात नाफेडच्या सोयाबीन खरेदीला वीस ते पंचवीस दिवसांची मुदतवाढ द्यावी, या मागणीचं निवेदन स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीनं काल जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलं. ही मुदतवाढ न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा या संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर ढगे यांनी दिला आहे.

****

सर्व माजी सैनिक, वीरनारी, वीरमाता, वीरपिता आणि अवलंबित, यांनी सैनिक कल्याण विभागाच्या पोर्टलवर नोंदणी करावी, असं आवाहन या विभागानं केलं आहे. तसंच याआधी दाखल केलेले अर्ज आणि संबंधित कागदपत्रांच्या प्रती छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात आणून द्याव्यात, असंही कार्यालयाकडून सांगण्यात आलं आहे.

****